९५/-

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण


९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १३८/प्रनिप्रा/ 9309 दिनांक : 14 JUN 2022

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, **दिनांक २ जुन, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६४ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. एम.बी. निकम, प्रशासकीय अधिकारी तथा परिक्षा समन्वयक, कृषी शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, २) श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, आयुष / वैद्यकीय शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ३) डॉ. (श्रीमती) रेश्मा देसाई, विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १२/०४/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | पदव्युत्तर वैद्यकीय आणि पदव्युत्तर नर्सिंग |

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक बैठक-१८२२/प्र.क्र.१०३/प्रनिप्रा/११९२, दिनांक १२/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाची ६४ क्रमांकाची बैठक गुरुवार दिनांक २ जुन २०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व पदव्युत्तर नर्सिंग या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित करण्यात आलेली आहे.

सदरील बैठकीस विशेष निमंत्रित म्हणुन उपस्थित राहण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना प्राधिकरणाद्वारे दिनांक १/०६/२०२२ रोजीच्या ईमेलद्वारे अवगत करण्यात आले होते, परंतू संचालक अथवा संचालनालयाच्या वतीने सदरील बैठकीस कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते, प्राधिकरण याबाबतची नोंद घेत असून या संदर्भात शासनास कळविण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहेत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्र वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांचा प्रवेश पडताळणी/छाननी करुन प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले नसलयाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर नर्सिंग अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयापैंकी ०८ महाविद्यालयांचे प्रवेश पडताळणी अहवाल प्राधिकरणास प्राप्त झालेले आहेत त्याची नोंद घेण्यात आली.

पदव्युत्तर नर्सिंग अभ्यासक्रमाचे प्रवेश हे संस्थास्तरावर करण्यात येत असल्याने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर एम.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित सर्व महाविद्यालयातील / विद्यार्थ्यांचे प्रवेश तपासणी/छाननी प्राधिकरण स्तरावर करण्याचे निर्देश आहेत. या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करुन सदरील छाननी/पडताळणी प्रक्रिया पुर्ण करुन त्याचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करावा.

संबंधित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तसेच प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी व उक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रांची तपासणी/छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर वैद्यकीय व नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

(ज. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिफारशीनुसार श्री. राहुल शिंदे यांची शिपाई पदावर ११ महिन्यांकरिता निव्वळ कंत्राटी तत्वावर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये नियुक्ती करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ख) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २(क) मधील निर्णयानुसार श्री. राजेश सदाशीव जाधव यांची जन संपर्क अधिकारी या पदावर निव्ळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली होती, सबब सदरील निर्णय तहकूब करण्यात येत असून या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबत उचित कार्यवाही त्वरीत करावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १५/६/२२